# हिंदू महिला सभेकडून मुलांना फराळ

**पुणे :** कर्वेनगरमधील सहजानंद सोसायटीजवळील वस्तीतील गरीब आणि वंचित मुलांबरोबर हिंदू महिला सभेच्या सदस्यांनी दिवाळी साजरी केली. आस फाउंडेशनच्या अनघा ठोंबरे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. या वेळी सर्व मुलांना दिवाळी फराळाच्या पदार्थांबरोबर जीवनावश्यक वस्तू आणि खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी सभेच्या सुप्रिया दामले, स्मिता नातू, मृणाल गोडबोले, नीला मोघे, प्राची सप्रे व सुधा लेले सहभागी झाल्या होत्या. नवरात्रीमध्ये समाजातील भिक्षेकरी, वंचित, उपेक्षित समाजातील मुलींसाठी रेणूताई गावस्कर यांच्या पुढाकाराने चालविण्यात येत असलेल्या 'घरटं' निवासी प्रकल्पातील मुलींचे कुमारिकापूजन करण्यात आले. तसेच, त्यांना मदतदेखील केली असल्याचे दामले यांनी सांगितले.